# आंबेडकरी कवयित्रींच्या कवितेतील स्त्रिवादी जाणिवा आणि मानवतावादी मूल्य

**डॉ. सुरेश खोब्रागडे**
विदर्भ महाविद्यालय लाखनी
जि. भंडारा
९३७३७११४३२
sureshkhobragade68@gmail.com

**सारांश :—**

१९६० च्या नंतर मराठी साहित्यात विलक्षण भर घालणारा आंबेडकरी जाणिवेचा काव्यप्रवाह आपल्या नाविण्यपूर्ण जाणिवेणे आणि विशिष्ट रचनाविष्काराने उद्‌यास आला. मराठीत अनेक प्रकारातून काव्यलेखन करण्यात आले आहे. भावकविता, भाष्यकविता आणि कथाकविता हे आपण काव्याचे ठळकपणे तीन प्रकार मानतो. सुनीत, गझल, हायकू, मुक्तछंद, ओव्या, अभंग, लोकगीते, पाळणा अशा अनेक प्रकारातून आंबेडकरवादी कविता लिहिल्या गेली. तमाशा, जलसे, कव्वाली, पोवाडे, यातून तर ती उत्स्फुर्तपणे, क्रांतिगीतासारखी बाहेर पडली. अशा या काव्यप्रवाहात कवयित्रीही मागे राहिल्या नाहीत. त्यांनी मुक्तछंदातून केवळ आंबेडकरी समुहातीलच दु:ख मांडले नाही तर समस्त स्त्री जातीच्या वेदनाही त्यांनी अत्यंत मार्मिकतेने मांडल्या. स्त्रीयांच्या समस्त प्रश्नांना त्यांनी वाचा फोडली. समाजातील अन्याय अत्याचारावर आपल्या विद्रोही जाणीवेने भाष्य करायला त्या मागे पडल्या नाही.

अशा काही महत्त्वपूर्ण कवयित्रीमध्ये हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार, प्रज्ञा लोखंडे (पवार), सुनंदा बोदिले, मल्लिका अमरशेख, सुगंधा शेन्डे, सुरेखा भगत, विमल गाडेकर अशा अनेक नावांचा आपल्याला आवर्जून उल्लेख करता येईल. तीन कवयित्रींच्या कवितेच्या अनुषंगाने प्रस्तुत निबंधात लेखकाने मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या कवितेतील मानवतावादी मूल्यांचा शोध घेत त्यांचे अनन्यसाधारणत्व सिद्ध करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. भारतीय समाजातील जळजळीत समस्यांचा वेध घेत व्यवस्थेतील मूल्यऱ्हासांची विदीर्ण करणारी भयानकता कवयित्रींच्या कवितेतून शोधून त्यांच्या कलात्मक जाणिवांचा शोध घेण्यात येणार आहे.

**प्रस्तावना :—**

आंबेडकरवादी कवयित्रींमध्ये शेकडो कवयित्रींची नावे अत्यंत सन्मानाने आपल्याला घेता येतील. ज्या काळात स्त्रिया शिकत नव्हत्या त्या काळात सावित्रीबाई फुले पुढे आल्या. ‘काव्यफुले’ या कवितासंग्रहातून त्यांनी व्यवस्थेतील विषमतेवर परखड भाष्य केले. तोच सावित्रीबाई फुल्याचा वारसा जपत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेतून १९६० च्या नंतर आंबेडकरी जाणिवेतून मानवतावादी भूमिकेचे साहित्य जन्माला आले. मुक्ताबाई गौड यांचा निबंध हा प्रारंभीचा आंबेडकरी साहित्यातील मूलस्त्रोत मानला जातो. ‘चूल’ आणि ‘मूल’ या संकुचित मानसिकतेतून बाहेर पडून प्रभावीपणे स्वत:चे अस्तित्व स्त्रियांनी निर्माण केल्याचे दिसून येते.

आबेडकरी कवयित्रींचा विचार करताना बऱ्याच स्त्रियांनी काव्यलेखन केल्याचे दृष्टीस पडते. हिरा बनसोडे, डॉ. ज्योती लांजेवार, प्रज्ञा दया पवार, शांताबाई हिवराळे, अभिनय दिप्ती निझरेकर, आशा माधव,

डॉ. सुनंदा बोदिले, अस्मिता मेश्राम, सरिता सातारडे, सुषमा पाखरे, विशाखा बोरकर, पुष्पाताई बोरकर, कुमुद पावडे, लीला पाटील, सुरेखा भगत, लीला भेले, मिना गजभिये, आशालता कांबळे, सरिता जांभुळे, संध्या रंगारी, प्रतिभा अहिरे, उषा अंभोरे, रजनी तिलक, समाकुमारी पांचाल, कौसल बैसंत्री, सुशीला टाकभौरे, धम्मज्योती शेगोकर, उषा हिंगोणेकर, अपर्णा लांजेवार, नेहा गोडघाटे, मीरा शिंदे, संगीता बनकर, चंद्रप्रभा निकम, माया वासनिक, ज्योत्सना चांदगुडे, सिसिलीया कार्व्हालो, निलांबरी शिर्के लक्ष्मी गवई, केशर मेश्राम, उषा बलकुंडे, सरिता रामटेके, डॉ. सांची भगत अशा कवयित्रींनी आंबेडकरी जाणिवेतून काव्यलेखन केले आहे. प्रस्तुत शोधनिबंधातून हिरा बनसोडे, डॉ. ज्योती लांजेवार आणि डॉ. सुनंदा बोदिले, यांच्या काव्यविषयक स्वरूपाचा आणि वैविध्यपूर्णतेचा शोध घेण्यात येणार आहे.

**हिरा बनसोडे यांची कविता :—**

हिरा बनसोडे हया आंबेडकरी काव्यप्रवासातील पहिल्या पिढीतील कवयित्री आहेत. 'पौर्णिमा', फिर्याद, 'फिनिक्स' यासारख्या कवितासंग्रहातून अत्यंत सामर्थ्याने त्यांनी काव्यलेखन केले असून आपले अनन्यसाधारण स्थान सिद्ध केले आहे. 'फिर्याद' कवितासंग्रहात 'हरवलेला सूर्य' या कवितेतून आपल्या कवितेचा स्वभावच त्यांनी खऱ्या अर्थाने प्रकट केला आहे. त्यातील विद्रोही सूर, बिनधास्तपणा परखड आणि निर्भीडपणा ओतप्रोत पाहायला मिळतो. त्या म्हणतात,

''कुठल्या दिशांना शाश्वत प्रकाश मागावा,
जिथला सूर्यच हरवला आहे ?
मरण हातात धरून चाललेल्या आम्हाला
वि ाच्या पेल्याची भीती कशाला?
ज्याने भवि याचेच अर्ध्य सोडलेय
मेलेल्या बेगडी संस्कृतीवर
त्याने वर्तमानाला मुजरा का करावा? ''१

असे गर्भगळीत करणारे अनेक प्रश्न कवयित्री व्यवस्थेला विचारते. तिला त्या प्रश्नांची उत्तरेही ठाऊक आहेत. म्हणूनच तर ती लढाई अटळ असल्याचे सांगते आणि हे युद्ध न संपणारे असल्याची तिला जाणीव आहे. म्हणूनच बिनधास्तपणे ती युद्धातील जय पराजयाचा विचार करीत बसत नाहीत. ती समस्त स्त्रीजातीचे प्रतिनिधित्व करते. स्त्रियांच्या जन्माला आलेले दु:ख अतिशय परखडतेने मांडते. फिर्याद मांडते आणि न्यायाची अपेक्षा ठेवते. कुटुंबात, समाजात, तिचा जीव गुदमरतो. तिच्या हक्क, अधिकार आणि स्वातंत्र्यावर गदा येते. तिला स्वत:च्या घरातच पारतंत्र्याची अनुभूती येते. 'मी कोण'? या प्रश्नाने तिचा जीव गुदमरतो. तिची सारी स्वप्ने अतृप्त राहतात. इच्छा आकांक्षांना मातीमोल समजून तिचा सातत्याने अपमान केला जातो. तिच्या भावनांना कवडीमोल समजून पुरूषी व्यवस्था तिला पायदळी तुडवितांना ती लादलेल्या संस्कृतीवर आगपाखड करू लागते. तिच्या विद्रोहाच्या निर्मितीला देशातील विषमता कारणीभूत होते. ठेचाळत, रक्ताळत जगतंना समस्त स्त्रियांच्या अंत:रंगात प्रखर आशावाद पेरताना ती म्हणते,

"रडू नकोस खुळे, उठ ! आणि डोळयातले हे आसू
सोडून दे शेजारच्या तळयात
नि घेऊन ये हातात
नुकतीच उमललेली शुभ्र कमळाची प्रसन्नफुले"२

कवयित्री अभंगातूनही फार मोठा आशय अभिव्यक्त करतात. गुलामीच्या डंखकळा या 'फिनिक्स' कवितासंग्रहातील कवितेत स्त्री जन्माचे दु:ख प्रतिपादन करून सूर्याचा जन्म घेण्याचे सांगताना ती म्हणते,

"कसा लाभला हा जन्म
म्हणे मानव जातीचा,
जातीजातीतल्या भिंती
उर फाटतो मातीचा
कसा लाभला हा जल्म
तसा का हो मी सोसीन ?
माय भीमाईच्या पोटी
जल्म सूर्याचा घेईन"३

अशाप्रकारे सूर्यकूळाशी आपले नाते सांगून देशातील जातीव्यवस्था मोडून काढण्याचे सूत्र बनसोडेंची कविता मांडताना दिसते. संघर्षाच्या अटळ असलेल्या जीवनपथावर अत्यंत कणखरपणे कवयित्री उभी आहे. स्त्रियांच्या वाटयाला आलेले साखळदंड तोडू पाहणारी तिची कविता कधी हळूवारपणे आपले अनुभव तरलतेने मांडते तर कधी खंबीरतेने, लढाऊ वृत्तीने आपल्या वेदनेला वाचा फोडू पाहते. तिच्या कवितेतील स्त्रिवादी जाणिवा मनाचा ठाव घेतात.

**डॉ. ज्योती लांजेवार यांची कविता :—**

डॉ. ज्योती लांजेवार यांनी वैचारिक ग्रंथलेखनासोबतच 'दिशा', 'शब्दनिळे आभाळ', 'अजून वादळ उठले नाही' असे कवितासंग्रह प्रकाशित केले आहेत. स्त्रीच्या व्यथावेदनेसोबतच समाजातील विषमतेवर आपल्या विद्रोही जाणिवेतून परखड भाष्य करीत सामर्थ्याने त्यांची कविता उभी राहताना दिसते. डॉ. ज्योती लांजेवार यांनी आपले आयुष्य सामाजिक कार्यात वाहून घेतले होते. स्त्रियांचे, मजुरांचे, दलित वंचितांचे, बहुजनांच्या प्रश्नांसाठी त्यांनी अनेकदा आंदोलन केले आहे. त्यांच्या कविता पाहताना एका कार्यकर्तीचे मन त्यात दिसून येते. 'अजून वादळ उठले नाही' या कवितासंग्रहातील 'तू कधी दिसली नाहीस' या दीर्घ कवितेत कष्टकऱ्या महिलेचे चित्रण त्यांनी उभे केले आहे. यातील महिला साधीसुधी महिला नाही. ती मजूर आहे. पण स्वाभीमानी आहे. काबाडकष्ट करुन रखरखत्या उन्हात घाम गाळणारी ती स्त्री डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने प्रभावित झाली आहे. म्हणूनच तिला नामांतराच्या आंदोलनात कवयित्रीने कारागृहात पाहिले आहे. या कवितेत बऱ्याच कार्यकर्त्या मजूर महिलांचे चित्रण कवयित्री करतात. त्या म्हणतात,

'' लॉंगमार्चमध्ये पुढेच चालून
नामांतर झालेच पाहिजे म्हणतात
पोलिसी दंडुका हातावर झेलून
ताठ मानेने कारागृहात जाताना
एकुलता एक पोटचा गोळा
गोळीबारात शहीद झालेला पाहून
'अरे, तू भीमासाठी मेलास
जन्माचे चीज झाले' म्हणताना
असं पोलीस अधिकाऱ्याला ठणकावून सांगताना

तू दिसलीस मला''४

अशा अत्यंत संवेदनशील कवितेतून भावस्पर्शी आंबेडकरी विश्व कवयित्रीने उभे केले आहे. ती निष्ठावान आहे. तिला वाकणे, झुकणे माहीत नाही. एकाच वेळेस ती अनेक गोष्टींबरोबर लढत राहते. तिला रडणे माहीत नाही. ती वेदनांकीत होते, आक्रंदते, आक्रोशते, टाहोही फोडत आणि लढाऊ वृत्तीने परिस्थितीचा मुकाबला करते. या लढाईत कुणी मुलगा मरण पावला तरी आई जन्माचे चीज झाल्याच्या आविर्भावात अभिमानाने स्वत:ला धन्य समजते. भीमासाठी पोटचा गोळा गेल्याचा तिचा अभिमान गदगदीत करणारा असा आहे. 'असाही पाऊस' या कवितेतला पाऊस म्हणजे डोळयातील अश्रूंच्या धारा पूर आलेल्या नदीसारख्या वाटतात. घरात अठराविश्व दारिद्रय, पोटात विलक्षण भूख, हाडकुळया बापाची असहायता, गिऱ्हाईक होऊन आलेला दलाल आणि अशा या गटारात लोळणाऱ्या संस्कृतीचे भीषण वास्तव कवयित्री उभी करते. ती म्हणते,

''डोळाभर कोसळणाऱ्या पावसात
तू चिंब ओली
तरी बरे... बदलायला रात्र तुझी
गडदल्या रात्रीचा दिवस होतो
पोटाची विवंचना सारखी
अमावस्येचा अंधार ओठात
जीव गुंतला हिरव्या नोटात''५

यातील प्रतिमा विलक्षण आहेत. अंतर्मन हेलावून टाकणारी ही कविता गदगदून सोडते. यातील दृश्य डोळयापुढे उभे राहते आणि हृदय गलबलून जाते. 'अजून वादळ उठले नाही' या कवितेत सखीला उद्देशून कवयित्री म्हणतात,

''घामाचे तेज कणाकणात पण इथे,
काळोखाला डोळे फुटले नाही,
ओंजळी भरभरुन दिल्या दानाला
शिव्याशापांचे ग्रहण सुटले नाही''६

यातील 'काळोखाला डोळे फुटले नाही' या ओळीतून कवयित्रीला निराशाजनक चित्र सांगायचे आहे. अभावग्रस्तता, वैफल्यग्रस्तता कशी तग धरुन आहे. याचे संसूचन करणारी ही कविता आहे. कवयित्रीला मागचा सारा हिशेब चुकता करायचा आहे. इतिहासाच्या पानांवरचे संदर्भ मिटवायचे आहेत. मात्र त्यांच्या मनासारखे काहीही घडत नाही. म्हणून विद्रोह पेरताना 'जाळू नये तर काय?' या कवितेत त्या नाईलाजास्तव युद्धाची भाषा वापरताना म्हणतात,

''मोकळया केसांचेही सत्व
आज तुडविल्या जाते पायाखाली
मग युद्धाचे शंख फुंकू नये तर काय?
कुरुक्षेत्र झाले आहे जगणे
तर शस्त्रसिद्ध होऊ नये तर काय?
पुन्हा नवे महाभारत लिहू नये तर काय?

मनुच्या स्मृतीला जाळू नये तर काय?[७]

विषमतेच्या बरबटलेल्या समाज व्यवस्थेला तोंडघशी पाडणारी ही कवयित्री आहे. व्यवस्थेने दिलेल्या जखमी जगण्याचा ती ताळेबंद मांडू पाहते. त्यांना मुद्दाम युद्ध नको आहे. त्या बुद्ध आणि आंबेडकरी मुशीतून घडलेल्या असल्याने लोकशाही त्यांना अभिप्रेत आहे. मात्र अराजकता पाहून त्यांच्यातील संवेदनशीलतेला विद्रोहाचा पूर येतो.

रुपकात्मकता, प्रतीकात्मकताही त्यांच्या कवितेत पाहायला मिळते. 'शब्दप्रबंध' या कवितेत प्रस्थापित व्यवस्थेच्या तकलादू भूमिकेवर त्यांनी मार्मिक भाष्य केले आहे. त्या म्हणतात,

'रद्दीत विकायला निघालेले आपले रद्दाड आयुष्य घेऊन
काही पोपट माझ्याकडे आलेत.
पोपटपंचीसह म्हणाले—
'आमचं आयुष्य आपल्यासाठी ठेवून घ्या.'
मला शब्दांचे मोल कळत होते
त्यांनी शब्दांचा भाव केला
'शब्द विकायचे नसतात' म्हटल्याबरोबर त्यांनी
शब्द विकलेल्यांचा शब्दप्रबंधच सादर केला.''[८]

या कवितेतील आशयघनता कवयित्रीच्या प्रतिभाशक्तीचा परिचय करुन देते.

**डॉ. सुनंदा बोदिले यांची कविता :—**

डॉ. सुनंदा बोदिले या नव्वदोत्तरी काळातील काव्यलेखन करणाऱ्या कवयित्री आहेत. त्यांचे 'आस' आणि 'माणूस, झाड आणि माती'(२०२१) असे दोन कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. 'मुक्तमंथन' या त्रैमासिकाची वाङ्मयीन चळवळ सध्या त्या चालवित असून आंबेडकरी वाङ्मयीन चळवळीला बळकटी आणण्याचा प्रयत्न करीत आहेत. 'माणूस, झाड आणि माती' या कवितासंग्रहातील आंबेडकरी जाणिवांवर, त्यातील मानवतावादी मूल्यांचा परामर्श घेऊन त्यांचे कवितेतील स्थान सिद्ध करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. त्यांच्या कवितेत स्त्रीवादी जाणिवांसोबतच आंबेडकरी जाणिवा अत्यंत प्रभावीपणे पाहायला मिळतात. परंपरागत स्त्रीला गुलामगिरीतून कवयित्री मुक्त करु पाहते. त्या म्हणतात,

''विश्वाची निर्माती तू तडफडत होती अधिकारासाठी
तुझी व्यथा कायम, तुझे पंख छाटलेले,
आता तू एक कर कर्मकांड, रुढी, परंपरा बंद कर
उंच झेप घेण्यासाठी संविधानाचे जतन कर''[९]

बोदिलेंची कविता पुरुषसत्ताक संस्कृतीच्या ठेकेदारांना खडसावताना दिसते. नैतिक मूल्यांची घसरण पाहून त्या अस्वस्थ होतात आणि खंबीरपणे स्त्रीची शक्ती, तिची ताकद दाखवू पाहतात. 'तिला जाग आली तर' या कवितेत त्या म्हणतात,

''खबरदार !
आमच्यातील झलकारी आहे अजूनही जिवंत
तिच्या सहनशीलतेचा अंत पाहू नका
वेळ आलीच तर ती स्वत:च्या

गर्भावरही तलवार चालवायला
मागेपुढे पाहणार नाही.''१०

यातील विद्रोह प्रलयाचे स्वरुप धारण करताना दिसतो. समस्त स्त्रियांच्या वाटयाला दु:खाचा वाळवंटच आलेला आहे. त्यातल्यात्यात पुरुषसत्ताक, भांडवली व्यवस्थेतून स्त्रियांचे झालेले शोषण आणि गळचेपीतून तिचे आयुष्य पार गुदमरुन गेलेले आहे. अशा पराकोटीच्या दु:खातून बोदिलेंची कविता जन्माला आल्याची दिसते. वांझ झालेल्या संस्कृतीने गर्भार राहावे, तिला पान्हा फुटावा अशी रास्त अपेक्षा ठेवत विषमता पोसणाऱ्या जल्लादांना जाब विचारताना कवयित्री म्हणतात,

' 'हे जल्लादांनो !
तुम्हीच ठरवा आयुष्याची प्रमेये
आत्मक्लेशाची वर्तुळेही
उद्ध्वस्त स्वप्नांच्या शोकांतिकेतून
होत नाही मानवी बिंदूचे केंद्रीकरण
संभ्रमित ज्ञानाच्या आत्मजागृतीने
मिळत नाही उदात्तीकरणाची प्रकाशवाट
त्यासाठी जाणून घ्यावा लागेल
भारतीय संविधानातील शब्दन्‌शब्द
आणि करुणामय बुध्द''११

यावरुन कवयित्रीची भूमिका आपल्या लक्षात येते. 'माणूस' हा त्यांचा, नव्हे एकूणच आंबेडकरी कवितेचा केंद्रबिंदू आहे. शोषित व्यवस्था बदलण्याची धडपड त्यांच्या कवितेतून जाणवते. प्रस्तावनेतन प्रा. सतेश्वर मोरे त्यांच्या कवितेची वैशिष्टये सांगताना म्हणतात, ''स्त्रीत्वाच्या वैविध्यपूर्ण जाणिवांचे चित्रण असलेला 'माणूस, झाड आणि माती' हा कवितासंग्रह मानवी समाजाचे अधोरेखन करताना समाजाला दोष देत नाही; तर या समग्र व्यवस्थेलाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करतो. शिक्षेचा अधिकार कवयित्रीकडे नाही; पण धिक्कारण्याचा अधिकार मात्र तिच्याकडे आहे. या व्यवस्थेचा धिक्कार करताना ती संविधानिक मूल्यांचा स्वीकार करते आणि सबंध समाजात या मूल्याचे आचरण आणि व्यवहार व्हावेत यासाठी धडपडते.''१२ एकूणच बुद्ध, आंबेडकरांच्या विचारधारेतून प्रसवलेली त्यांची कविता समाजात मूलभूत स्वरुपाच्या बदलाची रास्त अपेक्षा बाळगते.

**समारोप :—**

आंबेडकरवादी कवयित्री हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार आणि सुनंदा बोदिले यांच्या कवितांचा अभ्यास केल्यास स्त्रीविषयक दु:खाचे वाळवंटच आपल्या हातात गवसते. पूर्वापार चालत आलेल्या रुढी, प्रथा आणि परंपरेत त्या स्त्रीचा जीव गुदमरतो अशा समग्र स्त्रिजातीला नरकयातनेतून या कवयित्री बाहेर काढू पाहतात. फुले, शाहू, आंबेडकरांचा तथा तथागत बुद्धाचा वारसा जपणाऱ्या या कवयित्री बुद्धाची अथांग करुणा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा संघर्षाचा मार्ग सांगत प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध आपला आवाज बुलंद करतात. हिरा बनसोडे यांनी आंबेडकरी कवितेच्या पहिल्या पिढीत आमुलाग्र क्रांतिचे काव्य रचीत स्वत:चा नावलौकिक मिळविला आहे तर त्यांच्या पाठोपाठ विशेषत: दुसऱ्या पिढीत डॉ. ज्योती लांजेवार यांनी केवळ वाङ्मयीन नव्हे तर आंबेडकरी सामाजिक आणि स्त्रीविषयक चळवळीत स्वत:च्या

कर्तृत्वाची विलक्षण छाप पाडली आहे. उपमा, रुपक, प्रतिमा, प्रतीके यांचा सम्यकमेळ त्यांच्या कवितेत पाहायला मिळतो. डॉ. सुनंदा बोदिले हया अलीकडच्या नव्वदोत्तरी कालखंडातील काव्यलेखन करणाऱ्या कवयित्री असून त्यांच्या कवितेला सामाजिक जाणिवेचा स्पर्श असल्यामुळे वर्तमानातील अधोगतीवर त्या मार्मिक तथा परखड भाष्य करताना दिसतात. आंबेडकरी साहित्यप्रांतात आपल्या स्वतंत्र शैलीमुळे तिघींचेही स्थान अनन्यसाधारण असल्याचे आपल्याला दिसून येते.

**निष्कर्ष :—**

१. हिरा बनसोडे या आंबेडकरी काव्यप्रांतातील पहिल्या पिढीतील कवयित्री असून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून संघर्ष करीत त्यांनी आपले काव्यलेखन फुलविले आहे.
२. हळूवारपणा, तरलपणा बनसोडे यांच्या कवितेतून येतो त्यावेळी विलक्षण सौंदर्य जाणीव आपणास होऊ लागते.
३. निर्भीडपणे व्यवस्थेवर भाष्य करतानाही आक्रस्ताळेपणा त्यांच्या कवितेत डोकावत नाही. तरीही विद्रोहाचे त्यातले सूर मनाचा ठाव घेतात. स्त्रीयांचे दु:ख अत्यंत प्रत्ययकारीरितीने त्यांनी मांडले आहे.
४. डॉ. ज्योती लांजेवार या दुसऱ्या आंबेडकरी पिढीतील कवयित्री असून त्यांच्याही कवितेत स्त्रीविषयक दु:खाच्या झळा पाहावयास मिळतात.
५. कार्यकर्ती ते कवयित्री असा लांजेवारांचा प्रवास असल्यामुळे बनसोडे सारख्याच आंबेडकरी जिवंत जाणिवा त्यांच्या कवितेत पाहायला मिळतात.
६. प्रतिमा, प्रतीके आणि रुपकात्मकता लांजेवारांच्या कवितेत दिसून येतात. त्यामुळे कवितेला सौंदर्य प्राप्त होते.
७. रोखठोकपणे आणि तटस्थतेने त्या आपली भूमिका कवितेतून मांडताना दिसतात. तरीही विद्रोहाला ऊरबडवेपणाचा स्पर्श होत नाही.
८. डॉ. सुनंदा बोदिले यांची कविता विशेषत: अभिधा आणि लक्षणेतून प्रकटते.
९. साधेपणा आणि सरळतेतून समाजव्यवस्थेतील समस्त स्त्रिजातीवरील अन्याय अत्याचाराचे मानवीय दृष्टीकोनातून मूल्यमापन करताना बोदिल्यांची कविता दिसते.
१०. चीड, आवेशातून प्रखर विद्रोह मांडताना आपल्या भूमिकेशी बोदिल्यांची कविता प्रामाणिक असल्याचे दिसून येते.
११. मानवतावादी मूल्यांचा ध्यास तीनही कवयित्रींच्या कवितेतून पाहायला मिळतो.
१२. संविधानिक लोकशाही रुजविण्याची तळमळ तिघींच्याही कवितेत पाहायला मिळते.

**सदंर्भ टिपा :—**


१. संपादक बी. रंगराव, 'मराठी दलित कविता' साहित्य अकादमी, नवी दिल्ली, पुनर्मुद्रण, २०१५, पृ. ५६, ५७
२. तत्रैव, पृ. ६१
३. तत्रैव, पृ. ६१, ६२
४. तत्रैव, पृ. ६५

५. तत्रैव, पृ. ६६
६. तत्रैव, पृ. ६७, ६८
७. तत्रैव, पृ. ६९
८. तत्रैव, पृ. ६९
९. सुनंदा बोदिले, 'माणूस, झाड आणि माती', संवेदना प्रकाशन, खापरखेडा, जि. नागपूर, जानेवारी २०२१, पृ. १६
१०.तत्रैव, पृ. ३९
११.तत्रैव, पृ. १०
१२.तत्रैव, पृ. ३०